# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.३०३६/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. गणेश बारकू पवार, रा.ओम साई रो-हाऊस, बागुल गुरुजी शेजारी, म्हाडा कॉलनी, समर्थ नगर, आडगांव शिवार, पंचवटी नाशिक, ता.जि.नाशिक. | सहा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. | कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. |

**सुनावणी दिनांक — ०२/०२/२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०४/०६/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अपूर्ण व चुकीची माहिती दिली.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती केलेली नाही.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८/०३/२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १२/०३/२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : २०१३ ते दि.०८/०३/२०२२

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** १) दि.२०/०१/२०२२ रोजी कुलसचिव कार्यालय येथे “अनुभव प्रमाणपत्र” मिळणेबाबत दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली आहे. २) सद्यस्थितीत सदर अर्जावर कोणता विभाग कार्यवाही करीत आहे. ३) सदर अर्जाला काही त्रुटी लावण्यात आली आहे का. ४) सदर विनंती अर्जानुसार कोणत्या विभागाकडून व किती कालावधीत अनुभव प्रमाणपत्र प्राप्त होईल. ५) सदर अर्जातील सोबत जोडलेल्या अंतर्गत पत्रानुसार एकूण संपूर्ण कालावधीत अर्जदारास किती वेतन देण्यात आले आहे.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. यांनी दि.०१/०४/२०२२ रोजीच्या

पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या व या कार्यालयातील संबंधित विभागाकडून दिनांक ३१/०३/२०२२ रोजी प्राप्त झालेल्या माहितीची प्रत देण्यात आली.

४. **प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ११/०४/२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ११/०४/२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : अपूर्ण माहिती दिली.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेला प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. यांनी दि.११/०५/२०२२ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना मुद्दा क्र.१ ते ५ ची समर्पक माहिती देण्याचे आदेशीत करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०८/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयातील संबंधित विभागाकडून प्राप्त झालेली माहिती देण्यात आली.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा —**

(१) **अपिलार्थी-** २०/०१/२०२२ रोजी माहिती अर्ज सादर केला होता जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली.

(२) **विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी-**अर्जदाराची सेवा ही कंत्राटदारामार्फत असल्याने सेवेच्या नोंदी कंत्राटदाराकडे असतात, विद्यापीठाच्या लेव्हलवर अनुभव सर्टीफिकेट देता येत नाही असे स्पष्ट केले.

६. **निष्कर्ष —**

(१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना वस्तुस्थितीदर्शक उत्तर दिले आहे. तथापि, अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

(१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक. यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दि.०८/०३/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/ वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

प्रस्तुतचे द्वितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** आ/ ३९२०    **15 OCT 2024**